# वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी, (महाराष्ट्र)

## विद्यापीठाचे संकेतस्थळ :

## http://www.vnmkv.ac.in

किटकशास्त्र विभाग, वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी यांचे तर्फे राबविण्यात येणारा

# "पिक संरक्षण व कृषि निविष्ठा व्यवस्थापन" पदविका अभ्यासक्रम

## (Diploma in Plant Protection and Agricultural Input Management)

**प्रवेश माहिती पुस्तिका**

**२०२० – २०२१**

**किंमत रु. ५००/-**

# विद्यापीठाचे संबंधीत अधिकारी

| अ.क्र. | पद | अधिका-याचे नांव | कार्यालय दुरध्वनी क्र. |
|---|---|---|---|
| १ | कुलगुरु, वनामकृवि, परभणी | डॉ. अशोक ढवण | (०२४५२) २२३००२ |
| २ | संचालक शिक्षण तथा अधिष्ठाता (कृषि) वनामकृवि, परभणी | डॉ. धर्मराज गोखले | (०२४५२) २२२६८७ |
| ३ | सहयोगी अधिष्ठाता व प्राचार्य, कृषि महाविद्यालय, वनामकृवि, परभणी | डॉ. सय्यद ईस्माईल | (०२४५२) २३३००७ |
| ४ | कुलसचिव, वनामकृवि, परभणी | श्री. रणजीत पाटिल | (०२४५२) २२९७५५ |
| ५ | विभाग प्रमुख, कृषि किटकशास्त्र विभाग, वनामकृवि, परभणी | डॉ. संजीव बंटेवाड | (०२४५२)२२८२३५ |

प्रकाशक

कुलसचिव
वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ,
कृषि नगर, परभणी – ४३१४०२

# वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी (महाराष्ट्र)

## "पिक संरक्षण व कृषि निविष्ठा व्यवस्थापन" अभ्यासक्रम

(Diploma in Plant Protection and Agricultural Input Management)

कृषि निविष्ठा विक्रेते यांच्याकडे कृषि निविष्ठा विक्रिचा परवाना प्राप्तिकरीता आवश्यक असलेले शास्त्रीय ज्ञान व किमान शैक्षणिक पात्रता यावी या करीता एखादा अल्प मुदतीचा पदविका अभ्यासक्रम असणे आवश्यक आहे. हीच बाब उपमहासंचालक (कृषि शिक्षण) भा.कृ.अ.नु.प., नवी दिल्ली यांनी पत्र क्र. Edu/५/७/२०१६, EQR (Pt.), दि. ०६/०१/२०१७ अन्वये सर्व कृषि विद्यापीठांना पिक संरक्षण व कृषि निविष्ठा व्यवस्थापन या बाबीवरील सर्वकष ज्ञानाचा अंर्तभाव असलेला एक वर्षीय पदविका अभ्यासक्रम सुरु करण्याविषयी निर्देशीत केले होते. त्यानुसार वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ कार्यकारी परीषद ठराव क्र. का/ ५२/२०२०/, दि. ११ जानेवारी, २० २० व शिफारस क्र. २९/२०२०, दि. ११/०९/२०२० ला अनुसरुन विद्यापीठाच्या कीटकशास्त्र विभागातर्फे राज्यातील कृषि निविष्ठा विक्रेत्यांकरीता "पिक संरक्षण व कृषि निविष्ठा व्यवस्थापन" या एक वर्षीय पदविका अभ्यासक्रमाची निर्मिती केली आहे. सन २०२०-२१ या शैक्षणिक वर्षापासून हा पदविका अभ्यासक्रम वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी यांच्याशी संलग्नित खालील विभागामध्ये शिकविल्या जाणार आहे.

| जिल्हा | विद्यापीठ संलग्न | दुरध्वनी क्रमांक / भ्रमणध्वनी | प्रवेश क्षमता |
|---|---|---|---|
| परभणी | विभाग प्रमुख, कृषि किटकशास्त्र विभाग, वनामकृवि, परभणी | (०२४५२) २२८२३५ | ६० |

## १. इतर माहिती व प्रवेशासंबंधी महत्वाच्या सुचना :

१) अभ्यासक्रमाची मुदत : १ वर्ष (दोन सत्रे)

२) प्रवेशाकरीता पात्रता : १० वी शालांत परिक्षा (एस. एस. सी.) पास

३) शिक्षणाचे माध्यम : मराठी

४) पदविकेचा कालावधी : ५२ आठवडे

५) अभ्यासक्रम संपल्यावर मिळणारी पदविका : पिक संरक्षण व कृषि निविष्ठा व्यवस्थापन पदविका

६) परिक्षा पध्दत :

- प्रत्येक सत्रामध्ये सत्रांत लेखी / प्रात्यक्षिक तसेच मध्यावधी परीक्षांचे आयोजन केले जाईल.
- सत्राच्या मध्यात विषयाच्या ५० % अभ्यासक्रमावर आधारीत मध्यावधी परीक्षा घेण्यात येईल.
- सत्राच्या शेवटी लेखी / प्रात्याक्षिक परीक्षांचे आयोजन केले जाईल.
- या परीक्षांच्या माध्यमातून प्राप्त गुणांच्या आधारे उमेदवारांचे मुल्यांकन केले जाईल
- परीक्षेचा निकाल उमेदवाराला मिळालेल्या गुणांच्या आधारे पुढील प्रमाणे घोषित केल्या जाईल.

| **मिळालेल्या गुणांची टक्केवारी** | **निकाल** |
|---|---|
| ३५% | उत्तीर्ण श्रेणी |
| ३५-६०% | व्दितीय श्रेणी |
| ६०-८०% | प्रथम श्रेणी |
| ८०% पेक्षा अधिक | प्राविण्य श्रेणी |

- प्रश्नपत्रिका सेट करणे, परीक्षा आयोजित करणे, उत्तर पत्रिका, रेकॉर्ड आणि असाइनमेंटचे मुल्यांकन करणे तसेच निकाल घोषित करणे, यासारख्या सर्व क्रियाकलापांसाठी कोर्स कोओर्डीनेटर व केंद्र प्रमुख जबाबदार राहतील. याकरीता केंद्र प्रमुखांनी त्यांना वेळोवेळी देण्यात येणा-या सुचनांचे तंतोतंत पालन करावे.
- पदविकेतील विषयांमध्ये उत्तीर्ण होण्यासाठी किमान ३५ % गुण प्राप्त करणे आवश्यक आहे.
- अयशस्वी उमेदवारांना रु. १०००/- प्रति विषय एवढी फी भरुन पुढील बॅचच्या अंतिम लेखी व प्रात्यक्षिक परीक्षेच्या वेळेला त्या विषयाची परीक्षा देण्याची संधी दिली जाईल.
- पुढील बॅच उपलब्ध न झाल्यास संबंधीत केंद्राच्या माध्यमातून अयशस्वी उमेदवारांकरीता सहा महिन्यांच्या आत विशेष परिक्षा घेण्यात येईल.

## 2. अभ्यासक्रम आणि विषय :

या अभ्याक्रमाचा कालावधी एक वर्षाचा असून त्यामध्ये दोन षड:ण्मासिक सत्रांचा अंतर्भाव राहील. वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठाने पुरस्कृत केलेले खालील विषय अभ्यासक्रमासाठी घ्यावे लागतील.

**प्रथम षड:ण्मासिक सत्र**

| विषयाचा संकेतांक, क्रेडीटस व शिर्षक | गुण | | एकूण गुण |
|---|---|---|---|
| | लेखी परीक्षा | प्रात्यक्षिक परीक्षा | |
| DPP – १११ (१+२=३) : मुख्य पिकावरील कीडी व त्यांचे व्यवस्थापन | ५० | १०० | १५० |
| DPP– ११२(१+२=३) : मुख्य पिकावरील रोग व त्यांचे व्यवस्थापन | ५० | १०० | १५० |
| DPP – ११३(१+२=३) : पिक शरीरक्रीया व अन्नद्रव्ये व्यवस्थापन | ५० | १०० | १५० |
| DPP – ११४(१+२=३) : किडनाशके व त्यांचे व्यवस्थापन | ५० | १०० | १५० |
| **सत्र क्रेडीटस – १२ (प्रथम सत्र)** | **२००** | **४००** | **६००** |

**व्दितीय षड:ण्मासिक सत्र**

| विषयाचा संकेतांक, क्रेडीटस व शिर्षक | गुण | | एकूण गुण |
|---|---|---|---|
| | लेखी परीक्षा | प्रात्यक्षिक परीक्षा | |
| DPP – १२५ (१+२=३) : बियाणे व बियाणे निर्मीती तंत्रज्ञान | ५० | १०० | १५० |
| DPP – १२६ (१+१=२ ) : तणे व तण व्यवस्थापन | ५० | ५० | १०० |
| DPP- १२७ (२+०=२) : कृषि निविष्ठा बाबतचे कायदे व नियम | १०० | - | १०० |
| DPP- १२८ (१+१=२) : रासायनिक खते व त्यांच व्यवस्थापन | ५० | ५० | १०० |
| DPP- १२९ (०+२=२) : प्रकल्प अहवाल व तत्संबंधीची कार्यवाही | - | १०० | १०० |
| **सत्र क्रेडीटस - ११** | **२५०** | **३००** | **५५०** |
| **एकूण क्रेडिटस – १२ + ११ = २३ (प्रथम सत्र ६०० व व्दितीय सत्र ५५० एकूण गुण ११५०)** | **४५०** | **७००** | **११५०** |

## ३. विद्यार्थ्यांची निवड :

- प्राप्त झालेल्या अर्जाची वैधता केंद्र प्रमुख यांनी नियुक्त केलेल्या छाननी समितीव्दारे केल्या जाईल.
- सदर अभ्यासक्रमाच्या केंद्रावर एका वर्षी ६० कृषि निविष्ठा विक्रेत्यांनाच प्रवेश दिल्या जाईल.
- या पदविका अभ्यासक्रमाच्या प्रवेशाकरीता वयाची कुठलीही अट नाही. तथापी प्रवेश घेते वेळी कृषि निविष्ठा विक्रेता हा अधिकृत परवाना धारक असावा ही मुख्य अट राहील.

- कृषि सेवा केंद्र चालवण्याचा परवाना भाडेतत्वावर घेतलेल्या उमेदवारांना मुळ परवानाधारकांच्या पुर्व संमतीने रु. १००/- च्या बाँड पेपरवर एक प्रतिज्ञा पत्र सादर करावे लागेल. प्रतिज्ञा पत्राचे प्रारुप (ANNEXURE-II) येथे जोडले आहे. मात्र, सदर व्यक्तीची पदविका भाडेतत्वावर घेतलेल्या केंद्राची अर्हता ग्राहय धरण्याचा अधिकार कृषि विभाग महाराष्ट्र शासन यांचा असेल.
- सरद पदविका अभ्यासक्रम हा वर्तमान परवानाधारक असलेल्या कृषि निविष्ठा विक्रेत्यांकरीता शासनाने निर्धारित केलेल्या किमान शैक्षणिक अर्हतेशी निगडीत असल्यामुळे त्यामध्ये सामाजिक अथवा इतर आरक्षणाचा आंतर्भाव राहणार नाही.
- अभ्यासक्रमाच्या प्रवेशाकरीता प्राप्त अर्जाची संख्या प्रवेश क्षमतेपेक्षा ( ६०) जास्त असल्यास इयत्ता १० वी च्या टक्केवारी नुसार गुणवत्ता यादी (Merit List) प्रसिध्द करुन प्रवेश प्रक्रिया राबविली जाईल.

## ४. उपस्थितीचे प्रमाण :

- अंतीम परिक्षेस पात्र ठरण्यासाठी प्रत्येक विषयातील उपस्थितीचे प्रमाण कमीतकमी ८० % असणे आवश्यक आहे. त्याशिवाय विद्यार्थ्याला परिक्षेत बसण्याची परवानगी देण्यात येणार नाही.
- सर्व विषयांचे वर्ग दर शनिवारला आयोजिले जातील. प्रात्यक्षिकांचे वर्ग संबंधित विषयाच्या प्रयोगशाळेत अथवा प्रक्षेत्रावरील शेतात गरजेनुरुप आयोजिले जातील.
- शनिवारला राष्ट्रीय अथवा धार्मिक सणा निमित्त सुटी आल्यास त्या ऐवजी दुस-या दिवशी म्हणजे रविवारी वर्ग आयोजिले जातील.
- उपहाराची वेळ दु.१२.३० ते १.०० वा. पर्यंत व चहापानाची वेळ दु.३.१५ ते ३.३० वा. पर्यंत राहील.

## ५. प्रवेश घेतांना बाळगावयाची दक्षता :

- गुणवत्तेनुसार प्रवेश निश्चित झाल्यास सर्व संबंधित कागदपत्रे व रु. ५०,०००/- चा धनाकर्ष केंद्र प्रमुख यांचे कार्यालयात सादर केल्या शिवाय कायम केला जाणार नाही.
- एकदा प्रवेश दिल्यानंतर कोणत्याही परिस्थितीत भरलेले शुल्क परत दिल्या जाणार नाही.
- किमान ३० उमेदवारांचे प्रवेश निश्चिती नंतरच त्या केंद्रावर हा अभ्यासक्रम सुरु केला जाईल व प्रत्यक्ष वर्ग भरविण्यास सुरुवात केली जाईल.
- केंद्र प्रमुखांव्दारे गठीत समितीमार्फत प्रवेश अर्जाची योग्य प्रकारे छाननी केली जाईल. तसेच कागदपत्रांच्या पुर्तते अभावी प्रवेशास अपात्र ठरलेल्या उमेदवारांना केंद्र प्रमुख सुचित करतील. अशा अपात्र उमेदवारांकडून कागदपत्रांची पुर्तता होईस्तोवर प्रवेशाचे शुल्क (धनाकर्ष) स्विकारला जाणार नाही.
- विद्यार्थ्यांची उपस्थिती बायोमॅट्रीक व्दारे नोंदविली जाईल.

## ६. अर्जासोबत जोडावयाचे दाखले :

प्रवेशासाठीचा अर्जाचा नमुना या माहिती पुस्तिकेच्या ANNEXURE – १ येथे उपलब्ध केला आहे. उमेदवारांनी अर्जामध्ये स्वत:ची माहिती भरुन त्या सोबत पुढील कागदपत्रे जोडावी.

अ) उत्तीर्ण झालेल्या परिक्षेच्या गुणपत्रिकांची सत्य प्रतिलीपी (Mark list of S.S.C./H.S.S.C.)

ब) खाजगी रितीने उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांनी संस्था प्रमुखाकडून घेतलेले चारित्र प्रमाणपत्र (Character Certificate)

क) कृषि निविष्ठा विक्रिसंबंधीचा शासकीय परवाना किंवा परवाना वापराविषयीचे शपथपत्र (Affidavit) (सत्य प्रतीलीपी)

ड) राष्ट्रीय अधिवास प्रमाणपत्र (सत्य प्रतिलीपी)

ई) राष्ट्रीय ओळख पत्र / आधार (प्रत्य प्रतिलीपी)

**टिप :** अर्जासोबत उमेदवाराने अलीकडच्या काळातील दोन पासपोर्ट साईज रंगीत छायाचित्रे (फोटो) व अर्जाचे शुल्क म्हणून "नियंत्रक वनामकृवि, परभणी " यांचे नावे काढलेला रु. ५००/- (अक्षरी – रु. पाचशे फक्त) चा धनाकर्ष जोडणे आवश्यक आहे. प्रवेश अर्जाचे प्रारुप व माहिती पुस्तिका http:www.vnmkv.ac.in या विद्यापीठाच्य संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

## ७. प्रवेश घेतांना भरावयाची फी :

- वनामकृवि, परभणी तर्फे या अभ्यासक्रमाच्या सन २० २०-२१ या शैक्षणिक वर्षाकरीता रु.५०,०००/- शुल्क निर्धारीत केले आहे.
- अभ्यासक्रमाचे शुल्क एकाच वेळेला भरावयाचे असून ते प्रवेशाचे वेळेलाच जमा करावे लागेल.
- प्रवेशुच्छूक उमेदवारांनी शुल्काची संपुर्ण रक्कम नियंत्रक, वनामकृवि, परभणी यांचे नावे कुठल्याही राष्ट्रीयकृत बँकेतून काढलेले रु. ५०,०००/- (अक्षरी रु. पन्नांस हजार फक्त) च्या धनाकर्षाच्या स्वरुपात केंद्राच्या कार्यालयात प्रवेशाच्या कागदपत्रांसहित जमा करावी.
- निर्धारीत शुल्क रचना व शुल्काची रक्कम यात कोणतीही बदल झाल्यास तो उमेदवारास बंधनकारक राहिल.

## ८. ओळख :

- प्रत्येक विद्यार्थ्यांजवळ ओळखपत्र असणे आवश्यक आहे. ओळखपत्राच्या आकाराचा फोटो कार्यालयास देउन ओळखपत्र मिळविता येतील. त्याकरीता रु. १००/- एवढे शुल्क आकारले जाईल.

## ९. अर्जदारासाठी आवश्यक सुचना :

- अर्जदाराने माहितीपत्रक व अर्ज पुर्ण वाचून नंतर सुवाच्छपणे स्वत:च्या हस्ताक्षरात अर्ज भरावा.
- उशीरा प्राप्त झालेला अर्ज रदद करण्यात येईल. तसेच एकदा अर्ज सादर केल्यानंतर त्यात कोणताही बदल करता येणार नाही. तसेच नंतर सादर केलेले कोणतेही प्रमाणपत्र स्विकारले जाणार नाहीत किंवा अगोदर सादर केलेले कोणतेही प्रमाणपत्र बदलता येणार नाहीत.
- अर्जामध्ये खोटी माहीती दिली असल्याचे निदर्शनास आल्यास अथवा खोटे प्रमाणपत्र किंवा माहीती देवून प्रवेश प्राप्त केला आहे असे निदर्शनास आल्यास प्रवेश केव्हांही रदद करण्यात येईल.
- कुठल्याही परिस्थितीत दुय्यम (Duplicate) दाखल्यावर प्रवेश दिल्या जाणार नाही.
- प्रवेश घेतांना छाननी समितीसमोर सर्व मुळ प्रमाणपत्रे सादर करावी लागतील. त्याशिवाय शुल्क स्विकारल्या जाणार नाही व प्रवेश रदद करण्यात येईल.
- अर्जदाराने स्वत:च्या फायद्याकरिता निवड यादी स्वत: संबंधीत संस्थेत येवून पहावी. संस्थेतर्फे कोणतीही सुचना पोष्टाने दिली जाणार नाही.
- खालीलपैकी एका किंवा जास्त कारणास्तव अर्ज “अपुर्ण” समजण्यात येउन रदद करण्यात येईल.

**अ)** अर्जावर अर्जदाराची स्वाक्षरी नसल्यास / अर्ज अपुर्ण भरला असल्यास

**आ)** कृषि निविष्ठा विक्रेता परवाना अथवा परवाना वापरासंबंधीचे प्रतिज्ञा पत्र न जोडल्यास

**इ)** शालांत परिक्षेची गुणपत्रिका जोडली नसल्यास किंवा उपरोक्त नमुद आवश्यक कागदपत्रांची पुर्तता न केल्यास

**ई)** अर्ज उशिरा प्राप्त झाल्यास

- या माहिती पुस्तकासोबत आवश्यक प्रमाणपत्रांचे नमुने जोडले आहेत.
- अर्जासोबत कोणतेही मुळ प्रमाणपत्र / मुळ प्रत जोडू नये अशी जोडलेली मुळप्रत गहाळ झाल्यास त्याची जबाबदारी अर्जदारावर राहील. केवळ जरुर त्या प्रमाणपत्राच्या सत्यप्रतिलीपी किंवा झेरॉक्स प्रती प्रमाणीत (Attested) करुन जोडणे आवश्यक आहेत.
- प्रवेशाचे वेळापत्रक माहिती पुस्तीकेमध्ये दिले आहे.
- प्रवेश प्रणाली कालावधी प्रवेश घेण्यासाठी अर्जदाराने नियम बाहय कृत्ये व बाहय हस्तक्षेप करण्याचा प्रयत्न केल्यास प्रवेश बाद करण्यात येईल.
- प्रवेश घेण्यासाठी अर्जदाराने ठरलेल्या वेळेच्या आत संबंधीत संस्थेत उपस्थित राहणे आवश्यक आहे.
- प्रवेशाबाबत विद्यापीठाचा निर्णय अंतीम राहील.

# "पिक संरक्षण व कृषि निविष्ठा व्यवस्थापन" पदविका अभ्यासक्रम
# प्रवेश प्रक्रिया वेळापत्रक

## शैक्षणिक वर्ष २०२० – २१

| | | |
|---|---|---|
| १. | प्रवेश माहिती पत्रक व आवेदन अर्ज विक्रिची सुरुवात | ०१.०२.२०२१ |
| २. | आवेदन अर्ज स्विकारण्याची शेवटची तारीख | ०१.०३.२०२१ |
| ३. | सामान्य गुणवत्ता यादी आणि निवड यादी प्रसिध्द करणे | १५.०३.२०२१ |
| ४. | निवड यादीतील उमेदवारांना प्रवेश देणे | १५.०३.२०२१ ते २२.०३.२०२१ |
| ५. | शैक्षणिक सत्राची सुरुवात | ०१.०४.२०२१ |
| ६. | प्राप्त अर्जाच्या कमतरतेमुळे काही जागा रिक्त असल्यास संबंधीत संस्था परस्पर अर्ज स्विकारुन व रितसर छाननी करुन विभाग प्रमुख, किटकशास्त्र विभाग, वनामकृवि,परभणी यांचे संमतीने प्रवेश देतील | ०८.०४.२०२१ पर्यंत |

**टिप :**

- वरील नमुद तारखांना सुटटी असली / जाहीर झाली तरी संबंधीत कार्यालय सकाळी ०९ ते ५ वा. पर्यंत सुरु राहतील याची संबंधीत कार्यालय प्रमुखांनी दखल घ्यावी.
- निवड झालेल्या उमेदवारांची सुची संबंधीत अभ्यासकेद्राच्या कार्यालयीन सुचना फलकावर बघावयास मिळेल तसेच विद्यापीठाच्या www.vnmkv.ac.in अधिकृत संकेत स्थळावर ती उपलब्ध राहील. मात्र यासाठी कोणत्याही प्रकारचा पत्र व्यवहार केला जाणार नाही.

**विभाग प्रमुख,**
**कृषि किटकशास्त्र विभाग,**
**वनामकृवि, परभणी**

**कुलसचिव,**
**वनामकृवि, परभणी**

**Annexure- I**

Application form for Enrolment for

Diploma in Agriculture Plan Protection and Agril. Input Management

Year ______________________ Centre ______________________

S.N. (for office use only) ________________________________________

**(Please fill the form in capital letters, carefully)**

| | | | | |
|---|---|---|---|---|
| Name in Capital letters | | : | | |
| Father's / Guardian's Name | | : | | |
| Date of Birth | | : | | |
| Sex | | : | | |
| Tel. No. with STD CODE | | : | | |
| E-mail ID | | : | | |
| Postal Address for Correspondence | | : | | |
| Education Qualification | | | | |
| SN | Examination | Year | School / College | University |
| 1 | SSC | | | |
| 2 | Intermediate | | | |
| Are you an input dealer If no, Name and details of the sponsoring firm | | : | Yes / No | |
| Address with Telephone Nos. | | : | | |
| License No. | | : | | |

**Enclosures :**

10th Certificate : Yes / No

10 + 2/ Degree Certificate : Yes / No

Any other (Specify list) : ____________________________

I hereby certify that all the information furnished above by me is correct to the best of my knowledge and belief. I understand and accept that furnishing of any false information on my part will automatically lead to disqualification of my candidature / enrolment and forfeiture of all the payments made by me towards program. I agree to abide by the code of conduct and rules as may be framed from time to time by authorities for smooth conduct of the programme .

**Date :** **Signature :**

**Place :** **Name :**

**Email ID :** **Phone / Mobile No. :**

**Note :**

i) After finalization of admission, Course fee paid will not to be returned.

ii) Two receipt photographs should be submitted in a separate cover duly super scribed as “Photographs’’ , along with application form.

## Annexure – II

कृषि सेवा केंद्र चालवण्याचा परवाना भाडेतत्वावर घेतलेल्या उमेदवारांनी मूळ परवानाधारकांच्या पूर्व संमतीने रु. १०० /- च्या बाँड पेपरवर सादर करावयाच्या प्रतिज्ञा पत्राचे प्रारुप

प्रतिज्ञापत्र

मी, नामे..........................................................................(प्रवेश घेणा-याचे नाव)................................ (पत्ता), खालील सही करणार या प्रतिज्ञापत्रान्वये सादर करीत आहे की श्री.श्रीमती........................................................................................ (मुळ परवाना धारकाचे नाव) मु................................पो............................. ता ................................ जि ............................... हे ...................... (कृषि सेवा केंद्राचे नाव व पत्ता) या कृषि सेवा केंद्राचे मुळ परवाना धारक (परवाना क्र.....................................) असुन त्यांचे कृषि सेवा केंद्र चालवण्याचा परवाना मी सन ........................................ पासून भाडेतत्वावर घेउन ..........................................या नावाने कृषि सेवा केंद्र .......................................................... (गावाचे नाव) येथे चालवत आहे.

वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ , परभणी अंतर्गत किटकशास्त्र विभागात "पिक संरक्षण व कृषि निविष्ठा व्यवस्थापन " या एक वर्षीय पदविका अभ्यासक्रमाकरीता प्रवेश घेत असतांना , सदरचा प दविका अभ्यासक्रम हा परवानाधारक कृषि निविष्ठा विक्रेत्यांकरीता शासनाने निर्धारीत केलेल्या किमान शैक्षणिक अर्हतेशी निगडीत असून सदर पदविका प्राप्तीतून मला प्राप्त होणा -या किमान शैक्षणिक अर्हतेच्या कुठल्याही प्रकारचा लाभ हा मुळ परवाना धारकास मिळणार नाही याची मला तसेच मुळ प रवानाधारकास पुर्ण जाणीव आहे. तसेच कृषि निविष्ठा विक्रेते परवानाधारकाविषयी शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या सर्व सुचनांचे तंतोतंत पालन करण्यास माझ्या सह मुळ परवानाधारक बांधील असून कृषि नि विष्ठा विक्रेते परवानाधारक विषयी भविष्या त उदभवणा -या कुठल्याही न्यायि क प्रकारणांशी सदर पदवि का अभ्यासक्रम निर्मिती शि क्षण संस्था अथवा हा अभ्यासक्रम राबविणारा संबंधित विषयाचा विभाग यांचा काडीमात्र संबंध नाही याचीही मला जाणीव असून त्यांना कुठल्याही परिस्थितीमध्ये जबाबदार धरण्यात येणार नाही . या विषयी या पदविका अभ्यासक्रमाचा प्रवेशधारक या नात्याने मी संबंधित मुळ परवानाधारक यांचे पुर्व परवानगीने बांधिलकी व्यक्त करीत आहे, करीता लिहून देत आहे

**दिनांक :** ..........................................................

**स्थळ :** ........................................................

**सही :** ........................................................

**कृषि निविष्ठा विक्रेत्याचे नाव पत्ता :** ............................................................................

**कृषि सेवा केंद्र व पत्ता :** ............................................................................